## प्रकरण पहिले

## विषय प्रवेश आणि अध्ययन पध्दती

प्रस्तावना.

उद्देश.

अध्ययन क्षेत्र.

तथ्य संकलन.

नमुना निवड.

शोध निबंधाचा आराखडा.

# प्रकरण पहिले

## विषय प्रवेश आणि अध्ययन पध्दती

**प्रस्तावना :**

कोणत्याही समाजाचा सर्वांगीण अभ्यास करतांना त्या समाजातील घटक असलेल्या लहान मोठया समुदायांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास होणे अनिवार्य असते. विशेषत: एखाद्या समाजात जेंव्हा बहुसंख्य आणि अल्पसंख्य असे संख्यात्मक वर्गीकरण करता येण्याजोगे आणि सांस्कृतिक भेद असलेले समुदाय असतात तेंव्हा अल्पसंख्य समुदायांच्या अभ्यासाअभावी समाजाचा संपूर्ण अभ्यास होत नाही. भारतीय समाजामध्यें म्हणूनच केवळ हिंदु कुटुंब, विवाह, जातीसंस्था, इत्यादींचा अभ्यास पुरेसा नाही. मुस्लिम, खिश्चन, शीख इ. अल्पसंख्य समुदायांचे स्वरूप व या समुदायांचा बहुसंख्य हिंदू समाजाशी संबंध यांचा अभ्यासही आवश्यक आहे. विशेषत: अलीकडच्या काळात राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात याला खास महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील कांही सामाजिक संस्था व त्यामध्ये होत असलेल्या परिवर्तनाचा सूक्ष्मस्तरीय अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे.

भाषा, धर्म, जाती आणि भौगोलिक वैशिष्टये या बाबतीत विविधता असणारा भारत हा एक देश आहे. ही विविधता किंवा संमिश्र समाजरचना हे वैशिष्टय असले तरी एकात्मितेच्या मार्गातील तो एक अडथळा आहे की काय असा प्रश्नही विचारवंतासमोर उपस्थित होत आहे. धार्मिक व सांस्कृतिक अस्मितेच्या नावाखाली प्रांतवाद, भाषावाद, जातीयता यांना खतपाणी मिळत असलेले दिसते. कांही भागामध्ये अलगतावाद पसरत असून स्वायततेच्या मागण्याही पुढे आलेल्या आहेत. विघटनाची प्रक्रिया कमी-अधिक प्रमाणात सुरु आहे. एकात्मता टिकविण्याचे प्रयत्न चालू असले तरी मूलभूत स्थिती जाणून घेवून एकात्मतेच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचे प्रयत्न अधिक शास्त्रीय व वाजवी ठरतील हे उघड आहे.

वर सांगितल्याप्रमाणे भारतात हिंदु बहुसंख्य आहेत (शे. ८२.६४) त्यांच्या तुलनेने मुसलमान अल्प असले तरी त्यांचा लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा क्रमांक लागतो. भारतात एकूण लोकसंख्येच्या शे. ११.३५ एवढे मुसलमान आहेत. शिवाय अल्पसंख्यांकापैकी सर्वात मोठा असा हा समुदाय असल्याने अनेक दृष्टीने त्याचे महत्त्व व वेगळेपण आहे. प्रजासत्ताक भारताच्या मतदान प्रक्रियेवर प्रभाव पाडणारा अल्पसंख्यांकांचा तो सर्वात मोठा गट आहे. मुसलमानांची धार्मिक व सांस्कृतिक वैशिष्टये हिंदूंच्यापेक्षा स्पष्टपणे वेगळी दाखविता येतात. शिवाय ही वैशिष्टये जतन करून ठेवण्याचा आग्रही प्रयत्न ही होत असतो. विशेषत: हिंदू-मुसलमान या दोन जमातीमध्ये अधून मधून घडणारे हिंसक संघर्ष, जातीयवादी व मूलतत्त्ववादी संघटनांची वाढ, धर्माचा राजकरणावरील प्रभाव अशा प्रकारच्या परिस्थितीत मुस्लिम अल्पसंख्य समुदायाचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष महत्त्वाचा ठरतो.

अल्पसंख्य समुदायाचा अभ्यास अनेक प्रकारे करता येतो. संपूर्ण भारतातील मुसलमानांचा अभ्यास हा व्यापक अभ्यास होईल. स्थानिक पातळीवर मुसलमान समुदायामध्यें होणारे स्थित्यंतर तपासून केलेला सूक्ष्म स्तरीय अभ्यास हा देखिल व्यापक अभ्यासात भर घालणाराच ठरतो व त्याच दृष्टीने प्रस्तुत अध्ययन हाती घेतले आहे.

## उद्देश :

एक अल्पसंख्य समुदाय म्हणून मुसलमान समाजातील परिस्थिती आणि अभिवृत्ती यामध्ये होणा-या बदलाचे स्वरूप समजून घेणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. स्तररचना, कुटुंबसंस्था, विवाह विषयक नियम, स्त्रियांचा दर्जा, शिक्षण, यासारख्या सामाजिक जीवनाच्या विविध बाजूमध्ये मुस्लिम समुदायात कोणते परिवर्तन होत आहे हा मर्यादित उद्देश जरी या अध्ययनासमोर असला तरी त्याच्या आधारे अल्पसंख्य समुदायाच्या कांही समस्यांची उकल होणे शक्य आहे.

## अध्ययन क्षेत्र

प्रस्तुत सूक्ष्मस्तरीय अध्ययनासाठी वाळवे तालुक्यातील इस्लामपूर या लहान शहराची निवड केली आहे. या गावची एकूण लोकसंख्या ३३०१६ इतकी असून त्यामध्ये मुस्लिम लोकसंख्या सुमारे ५१०० ( शे. १५.४) इतकी आहे. अखिल भारतीय पातळीवर मुसलमानांची लोकसंख्या ११.३५ % आहे. हे लक्षात घेतल्यास इस्लामपुरातील अल्पसंख्य मुसलमान समुदाय संख्यात्मक दृष्टया तरी प्रातिनिधिक मानता येईल. शिवाय इस्लामपुर येथील मुसलमान समाजात निश्चित स्तररचना व सामाजिक गट आहेत. इस्लामपुर हे नगरपालिका असलेले शहर आहे. तेथे महाविद्यालयीन शिक्षणाची सोय आहे. लहानमोठया उद्योग धंदांचा विकासही होत आहे. त्यामुळे आधुनिकीकरणाची प्रक्रिया या भागात सुरू असल्यामुळे या प्रक्रियेचा मुसलमान समुदायावर कितपत प्रभाव पडतो आहे हे ही तपासून घेणे शक्य आहे. बहुपत्नीत्व, घटस्फोट, उर्दू माध्यमातून शिक्षण, कुटुंब नियोजनाचा स्वीकार इ. बाबतीत मुसलमान समुदायातील सत्य परिस्थिती समजून घेण्याजोगी आहे. एकंदरीत इस्लामपुर हे शहर मुसलमान समुदायाच्या अभ्यासाच्या दृष्टीने एक प्रातिनिधीक क्षेत्र समजण्यास हरकत नाही.

## तथ्य संकलन :

मुस्लिम धर्मा विषयी आणि भारतीय मुसलमान समाजा विषयीची सर्व सामान्य माहिती प्रकाशित ग्रंथांच्या आधारे मिळविली आहे. वस्तुनिष्ठ माहितीच्या संकलनासाठी मुलाखत पध्दतीचा वापर केला आहे. याकरिता समाज जीवनाच्या विविध बाजूंची माहिती मिळविणारे प्रश्न तयार केले. कुटुंब, विवाह, शिक्षण, स्त्रियांचा दर्जा, जाती इ. विषयी प्रत्यक्ष स्थिती आणि दृष्टीकोन जाणून घेण्याच्या दृष्टीने हे प्रश्न आहेत. कांही प्रश्न खुले आणि कांही बंद स्वरूपाचे आहेत. (प्रश्नसूचि शेवटी परिशिष्ट म्हणून जोडली आहे) संकलित केलेल्या माहितीच्या आधारे इस्लामपुरातील मुस्लिम समाजजीवनाविषयी, त्यामध्ये होणाऱ्या बदला विषयी आणि संबंधित व्यक्तींच्या विविध प्रश्नांविषयीच्या दृष्टिकोनाविषयी विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत.

<u>नमुना निवड :</u>

इस्लामपुरात मुसलमानांची अंदाजे ५०० कुटुंबे आहेत. त्यांचे प्रमुख गट विचारात घेऊन आडनावांची यादी तयार केली. यापैकी १०० कुटुंब प्रमुखांच्या मुलाखती घ्यावयाचे ठरविले. निवडलेल्या नमुन्यामध्ये जास्तीत जास्त आडनावाचे कुटुंब प्रमुख समाविष्ट व्हावेत म्हणून हिस्सेवारी (Quota) नमुना निवड पध्दतीचा वापर केला प्रत्येक आडनावाकरीता मुलाखत देणा-यांची संख्या त्या आडनावाच्या एकूण कुटुंब प्रमुखांपैकी २० % इतकी निश्चित केली. त्यानुसार निवडलेल्या कुटुंब प्रमुखांची आडनाववार संख्या पुढील पानावरील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे आहे. (कोष्टक क्रं. १)

प्रत्यक्षात मुलाखत घेताना ज्यांनी मुलाखती देण्याची तयारी दर्शविली अशांचीच म्हणजे सोयिस्कर पध्दतीनेच मुलाखात घेणे शक्य झाले. त्यामुळे निघणा-या निष्कर्षांचा प्रातिनिधिकपणा कमी झाला हे खरे, पण असे करण्याखेरीज दुसरा उपाय नव्हता. कांही कुटुंब प्रमुखांनी मुलाखत देणे सपशेल नाकारल्यामुळे असे करणे भाग पडले.

## कोष्टक क्रमांक–१

| अ. नं. | आडनांव | एकुण कुटुंबे | मुलाखती करिता निवडलेली कुटुंबे |
|---|---|---|---|
| १ | पटवेकर | ४७ | ९ |
| २ | मुल्ला | ४१ | ८ |
| ३ | मोमीन | ४१ | ८ |
| ४ | जमादार | ३३ | ६ |
| ५ | तांबोळी | ३६ | ७ |
| ६ | मणेर | २३ | ४ |
| ७ | मुबुते | २१ | ४ |
| ८ | शेख | २१ | ३ |
| ९ | पठाण | १६ | ३ |
| १० | आतार | ११ | २ |
| ११ | शिकलगार | ११ | २ |
| १२ | तानेखान | ११ | २ |
| १३ | पुणेकर | १३ | २ |
| १४ | खाणजादे | १० | २ |
| १५ | सुतार | १४ | २ |
| १६ | मुजावर | १५ | २ |
| १७ | दिवाण | १३ | २ |
| १८ | कच्छी | २ | १ |
| १९ | डंगरे | ७ | १ |
| २० | काझी | २ | १ |
| २१ | पटेल | ८ | १ |
| २२ | नदाफ | ९ | १ |
| २३ | नायकवडी | ७ | १ |
| २४ | महाम्री | ७ | १ |
| २५ | सैदेखान | ९ | १ |
| २६ | आगा | ७ | १ |
| २७ | भादी | ६ | १ |
| २८ | मुलाणी | ५ | १ |
| २९ | इनामदार | ५ | १ |
| ३० | हवलदार | ४ | १ |
| ३१ | गोलंदाज | ४ | १ |
| ३२ | चाऊस | ४ | १ |
| ३३ | पीरजादे | ४ | १ |
| ३४ | कसाई | ८ | १ |
| ३५ | गवंडी | २ | १ |
| ३६ | बारस्कर | २ | १ |
| ३७ | फकीर | २ | १ |
| ३८ | मुंडे | २ | १ |
| ३९ | नालबंद | २ | १ |
| ४० | वडगांवकर | १ | १ |
| ४१ | वाईकर | २ | १ |
| ४२ | बासडे | २ | १ |
| ४३ | खान | १ | १ |
| ४४ | हुजरे | १ | १ |
| ४५ | पन्हाळकर | १ | १ |
| ४६ | किणीकर | १ | १ |
| ४७ | मुणाते | १ | १ |
| ४८ | संदे | १ | १ |
| ४९ | खालीफ | १ | १ |

UNIVERSITY LIBRARY KOLH

शोध निबंधाचा आराखडा :

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाचे स्वरूप व अध्ययन पध्दती विषयी थोडक्यात माहिती दिल्यावर दुस-या प्रकरणात इस्लाम धर्माचा उदय, धर्म संस्थापक, धर्माचे स्वरूप, धर्म प्रसार इत्यादी विषयीचे विवेचन केले आहे.

तिस-या प्रकरणात "अल्पसंख्य" समुदायाविषयी संक्षिप्त सैध्दान्तिक भूमिका स्पष्ट करून भारतातील मुसलमान अल्पसंख्य समुदाय व त्याच्या सामाजिक जीवनाचा परिचय करून देण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात इस्लामपूरची प्रस्तुत संदर्भात आवश्यक ती माहिती दिली असून इस्लामपूरातील अल्पसंख्य मुसलमान समाजाविषयी थोडक्यात रूपरेषा दिली आहे.

पाचव्या प्रकरणात इस्लामपुरातील १०० मुसलमान कुटुंब प्रमुखांच्या घेतलेल्या मुलाखतींच्या आधारे मुसलमान समाज जीवनाविषयी, त्यामध्ये होत असलेल्या बदलांविषयी, मुसलमानांच्या अभिवृत्ती विषयीचे निष्कर्ष, त्यांच्या प्रमुख समस्या प्रस्तुत करून समारोप केला आहे.